# प्रतिक्रिया

दि. ९ सप्टेंबर २०१२ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात एक अतिशय सुरेख असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम मी माझ्या पूर्ण आयुष्यात कधीही विसरू शकणार नाही. या कार्यक्रमातून जे काही ज्ञान मला मिळाले, ते इतर कोणत्याही माध्यमाद्वारे मिळणं अवघड होते. संशोधनक्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींच्या तोंडून त्याचे बरे-वाईट अनुभव ऐकण्याची संधी मला माझ्या विद्यार्थीदशेतच मिळाली म्हणून मला खूपच आनंद वाटतो आहे.

या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद नाडकर्णी यांनी केले. त्यांची प्रत्येक गोष्ट जाणून घेण्यासाठी उत्साह आणि त्यांच्या बोलण्याची शैली फारच आकर्षक, प्रेक्षकांना मोहून टाकणारी अशी आहे. त्यामुळे कार्यकमिंची रंगत वाढली.

'वेध' परिषदेत एकूण पाच शास्त्रज्ञांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यात विशेष म्हणजे हे सर्व शास्त्रज्ञ तरुण होते. त्यातील राजदीप चॅटर्जी व रोहन शेट्टी हे तर माझ्या मोठ्या भावाच्या वयाचे होते. त्यांनी इतक्या लहान वयात एवढे संशोधन केले हे ऐकून मला फारच आश्चर्य वाटले. आणि मला ऊर्जा मिळाली. आपणही असे काही करू शकतो, अशी ऊर्मी मिळाली.

– साक्षी वाणी
इयत्ता : ९ वी, पुणे.

'वेध' या कार्यक्रमातून मुलांना शिक्षणासाठी विविध विषयांची माहिती मिळतेच; पण मुलांना या व्यक्तींकडून काही चांगले गुणही घेता येतात. या 'वेध' परिषदेत मला या शास्त्रज्ञांकडून खूप काही शिकायला मिळाले. जर आपल्यामध्ये कोणती गोष्ट करायची असेल, तर ती करण्यासाठी आपल्यात तळमळ, चिकाटी, जिज्ञासा असावी लागते हे आपल्याला तेजस गुप्ते यांच्याकडून शिकायला मिळाले, तर १३ वर्षांच्या मायाकडून आपल्याला हे शिकायला मिळते की, कोणतेही कार्य करण्यासाठी आपल्याला वयाची मर्यादा नसते.

या वर्षीची ही 'वेध' परिषद खूप चांगली होती. या परिषदेमुळे मला संशोधन कसे केले जाते हे समजले. विज्ञान-तंत्रज्ञानासंबंधीची माहिती मिळाली. या 'वेध'च्या कार्यक्रमातून मला वैज्ञानिक ज्ञान प्राप्त झाले. विज्ञानाविषयी मला आणखी माहिती मिळाली. त्यामुळे या 'वेध'च्या कार्यक्रमाला दरवर्षी उपस्थित राहण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

– अर्चना नरहरी तेली, विठ्ठलवाडी, पुणे.

आपण नेहमी जे कार्य करतो. त्या प्रत्येक कार्यास आपण स्वत:ला शोधत असतो.त याचप्रमाणे एक बालशास्त्रज्ञ म्हणजे माया बुऱ्हाणपुरकर हिने कोणाचीही मदत न घेता औषधांची Reaction करून तिने स्वत:ला शोधले आहे, असे मला वाटते. मला या कार्यक्रमातून वैज्ञानिक ज्ञान प्राप्त झाले आहे. मला या कार्यक्रमात सहभागी झाल्याचा खूपच आनंद झाला. या कार्यक्रमाला दरवर्षी येण्याचा प्रयत्न करीन. वैज्ञानिक होण्याची व त्याची पूर्व तयारी करण्याची क्षमता मला कळली. त्यांच्याप्रमाणेच आपणही असेच मोठे व्हावे, ही कल्पना जागृत झाली. शिक्षणात येणाऱ्या अडचणींना कसे सोमोरे जावे, याची प्रेरणा मला त्यांच्याकडून मिळाली.

– प्रियांका रमेश भुवड
इयत्ता : ९ वी, विठ्ठलवाडी, पुणे.

मला कुणीतरी मोठं व्हायचंय. काहीतरी वेगळं करायचंय; पण नक्की काय करायचंय? मोठं व्हायचंय म्हणजे नक्की कसं मोठं व्हायचंय? कुणासारखं?

हे सर्व प्रश्न मुलांच्या मनामध्ये पडलेले असतात. त्याचं उत्तर म्हणजे तुमचा हा कार्यक्रम होता. कुमारवयातील मुलं आयडॉल्स शोधत असतात. ते आयडॉल्स समोर आणून उभी करण्याचं काम तुम्ही केलं आहे.

आपल्या मुलांनी यशस्वी व्हावं हे प्रत्येक पालकाचं स्वप्नं असतं; पण ते मुलांना कसं समजावून सांगावं हे कळत नसते. तुमच्या कार्यक्रमाने पालकांचं काम सोपं करून टाकलं. तुम्ही मुलाखतीसाठी निवडलेल्या व्यक्ती या फार मोठ्या वयाच्या नव्हत्या. त्यामुळे मुलांना त्या जवळच्या, स्वत:सारख्याच वाटल्या; आणि 'अरे' हा करू शकतो, तर मी का नाही? हा विचार मुलांच्या मनात येऊ शकला. यातच कार्यक्रमाचं यश आहे.

– सौ. उर्मिला संतोष घोरपडे, पुणे.